MHAU080019232025

विशेष दिवाणी दावा **क्र.३०/२०२५.**

**( अमोदी – विरुध्द – शेख जलील व इतर)**

**<u>निशाणी क्र.२७ खालील आदेश</u>**

१. प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र.१ ने दिवाणी प्रक्रीया संहिता कलम १० नुसार दावा स्थगीत होण्याबाबत दाखल केलेला आहे. या अर्जावरती वादीने नि.क्र.२८ वरती आपले म्हणणे सादर करुन अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली आहे.

२. प्रतिवादी क्र.१ चे थोडक्यात म्हणणे की, वादीने प्रतिवादी क्र.१ व इतर प्रतिवादींविरोधात वादी हा ग्रामपंचायत घर क्र.१६४६ ज्याचा नगर भुमापन क्र.४४२ मौजे सिल्लोड या मिळकतीचा वादी हा मालक व ताबेदार आहे हे घोषीत करण्याबाबत व निरंतर ताकीदीचा दावा दाखल केलेला आहे. सुरुवातीला रे.मु.नं.४६९/२०२४ हा प्रस्तुत प्रतिवादी क्र.१ जो की त्या दाव्यातील वादी आहे. त्याने दिवाणी न्यायालया कनिष्ठ स्तर सिल्लोड येथे करार पुर्तीचा व त्या दाव्यातील प्रतिवादी क्र.१ ने प्रतिवादी क्र.२ च्या हक्कात करुन दिलेले खरेदीखत रद्दबातल करण्याचा आणि निरंतर ताकीदीचा दाखल केला होता. त्या दाव्यात प्रतिवादींनी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ७ नियम ११ नुसार अर्ज सादर केला होता व तो अर्ज मंजुर झाला आणि वादीचा वादा रद्द बातल करण्यात आला होता. त्या नाराजीने प्रतिवादी क्र.१ ने माननीय जिल्हा न्यायालय औरंगाबाद येथे नि.दि.अपील क्र.४२/२०२५ दाखल केले होते. त्यामध्ये मा.जिल्हा न्यायाधिश क्र.४ यांनी जैसेते ठेवा आदेश पारित केला होता. मा.जिल्हा न्यायाधिश क्र.४ औरंगाबाद यांनी ते अपील मंजुर केले व पुन्हा प्रकरण सुनावणीकामी पाठवले होते व जैसे ते ठेवा आदेश दि.१०.०६.२०२५ पर्यंत कायम केला होता. मा.

दिवाणी न्यायाधिश क. स्तर सिल्लोड यांनी पुन्हा तो दावा सुनावणीकामी घेतला व प्रतिवादी क्र.१ व २ यांनी नि.क्र.८ खाली दिलेला अर्ज दि.०२.०७.२०२५ रोजी नामंजुर केला आणि वादीला योग्य त्या न्यायालयात म्हणजेच दिवाणी न्यायालय व. स्तर सिल्लोड येथे दाद मागण्या कामी दावा परत केला आणि न्यायालयीन शुल्क १५ दिवसांच्या आत भरण्याचे आदेश दिले तसेच दिवाणी न्यायालय व. स्तर सिल्लोड येथे दावा दाखल करेपर्यंत जैसेथे ठेवा आदेश कायम केला. त्यानंतर वादीने मा.दिवाणी क.स्तर सिल्लोड येथे विशेष दिवाणी दावा क्र.२९/२०२५ हा दाखल केला. हा दावा दाखल करण्यापुर्वी वादीने वि.दि.दा.क्र.२९/२०२५ दाखल केला ज्यामध्ये वादीची मालकी आहे व तो दावा न्यायप्रविष्ठ आहे. या दाव्यातील वाद प्रश्न आणि अगोदरच्या दाव्यातील वाद प्रश्न हे प्रत्यक्षपणे सारखेच आहेत. दोन्ही दाव्यातील पक्षकार हे एकाच मालकी हक्का संदर्भात दाद मागत आहेत. या दाव्यातील गुंतागुंत टाळण्यासाठी हा दावा स्थगीत ठेवणे योग्य आहे.

**३.** वादीचे म्हणणे की, प्रतिवादी क्र.१ ने प्रस्तुतचा अर्ज हा नि.क्र.५ ची सुनावणी लांबवण्याकामी सादर केलेला आहे. प्रतिवादी क्र.१ चा अर्ज दखलपात्र नाही. या दोन्ही दाव्यातील विनंती व दाव्याचे कारण वेगवेगळे आहेत. दोन्ही दाव्यातील मुद्दे सुद्धा वेगवेगळे आहेत त्यामुळे अर्ज नामंजुर करावा.

**४.** प्रतिवादी क्र.१ तर्फे विधीज्ञ श्री. ए. एम. इनामदार व वादीतर्फे विधीज्ञ श्री. ए. व्ही. देशपांडे यांचा सविस्तर युक्तीवाद ऐकण्यात आलेला आहे. संचिकेचे व अभिलेखावरती दाखल कागदपत्रांचे अवलोकन केले. आजच्याच बोर्डवरती वि.दि.दा.क्र.२९/२०२५ हा आहे.

**५.** प्रस्तुतचा दावा हा ग्रामपंचायत घर क्र.१६४६ ज्याचा नगर भुमापन क्र.४४२ मौजे सिल्लोड संबंधी वादी हा याच मिळकतीचा मालक आणि ताबेदार आहे असे जाहीर करावे आणि प्रतिवादी विरोधात निरंतर ताकीद मिळण्याकामी दाखल केला आहे. वि.दि.दा.क्र.२९/२०२५ हा ग्रामपंचायत घर क्र.१६४६ ज्याचा नगर

भुमापन क्र.४४२ मौजे सिल्लोड संबंधी प्रतिवादी क्र.१ अन्सारी याने कराराची पुर्तता करुन वादीच्या हक्कात खरेदीखत करुन द्यावे व प्रतिवादी क्र.१ अन्सारी याने दि.१०.१२.२०२४ रोजी प्रतिवादी क्र.२ अमोदी याच्या हक्कात करुन दिलेले खरेदीखत रद्दबातल करण्यासाठी दाखल केला आहे.

**६.** वि.दि.दा.क्र.२९/२०२५ मधील प्रतिवादी क्र.१ अन्सारी हा या दाव्यात पक्षकार नाही. तसेच या दाव्यातील प्रतिवादी क्र.२ ते १५ हे वि.दि.दा.क्र.२९/२०२५ मध्ये पक्षकार नाही. जरी या दोन्ही दाव्यातील वाद मिळकत ही एकच दिसत असली तरी, या दोन्ही दाव्यातील केलेल्या मागण्या व दावा दाखल करण्याचे कारण हे वेगवेगळे आहे. या दोन्ही दाव्यातील मागण्या ह्या वेगवेगळ्या असल्याच्या अनुषंगाने मुद्देही वेगवेगळे असु शकतात. हे दोन्ही दावे निशाणी क्र. ५ च्या युक्तीवादाकामी न्यायप्रविष्ठ आहेत. विशेष दिवाणी क्र.२९/२०२५ मध्ये वादीने वेळोवेळी अर्ज देवुन निशाणी क्र.५ च्या सुनावणी कामी मुदत घेतल्याचे दिसुन येते. एकंदरीत प्रस्तुत प्रकरणात विशेष दिवाणी दावा क्र.२९/२०२५ मधील वादी जो की या दाव्यात प्रतिवादी क्र.१ आहे. त्याने प्रस्तुतचा अर्ज देवुन प्रकरण लांबवु इच्छीतो की काय असा प्रश्न निर्माण होतो. सद्यास्थितीत अर्ज मंजुरीस सबळ कारण नाही. करीता आदेश.

## आदेश

१. अर्ज (नि.क्र.२७) नामंजुर करण्यात येतो.

Digitally signed by SUSHIL SHARADRAO DESHMUKH
Date: 2026.03.04 10:47:46 +0530

(सु. श. देशमुख)

दिनांक : २७.०२.२०२६. दिवाणी न्यायाधीश (व. स्तर), सिल्लोड.